पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation**

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/
Ref. No. : PAHSU/BOEE/
जा. क्र. पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन/२०१९/2027

दिनांक :
Date :
दि. 21 SEP 2019

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय :** जुलै २०१९ ते ऑगस्ट २०१९ या कालावधीत अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या पूर परिस्थितीत बाधीत आपदग्रस्तांना मदत करण्याबाबत...

**संदर्भ :** महाराष्ट्र शासन क्र. सीएलएस-२०१९/प्रक्र.१६५/म-३ दि.२०/०८/२०१९.

महोदय/महोदया,

मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक दि.१९/०८/२०१९ रोजी पुरग्रस्तांच्या मदतीबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये पूरग्रस्तभागातील मुलांची परीक्षा फी माफ करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुषांगाने महाराष्ट्र शासनाचे दि. २०/०८/२०१९ रोजीचे शासन निर्णय अवलोकनी घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. [दि. २०/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.]

आपला विश्वासू,

21/09/2019

(डॉ. श्री. रा. कोकरे)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत : वरील प्रमाणे.

सचिव
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
जावक 4417
दि. 21/8/19

# महाराष्ट्र शासन

क्रमांक-सीएलएस-२०१९/प्र.क्र.१६५/म-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २०.८.२०१९

प्रति,

अ.मु.स. / प्रधान सचिव / सचिव,

वित्त विभाग, गृहनिर्माण विभाग / महसुल व वन विभाग (महसुल) / पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग / ग्रामविकास विभाग / नगर विकास विभाग (नगरविकास-२) / सहकार विभाग / कृषि व प.दु.म. विभाग (कृषि) / कृषि व प.दु.म. विभाग (प.दु.म.) / शालेय शिक्षण व क्रिडा विभाग / उच्च व तंत्रशिक्षण विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग / ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा) / जलसंपदा विभाग / जलसंपदा विभाग (लाक्षेवि) / अन्न व नगारी पुरवठा विभाग / सार्वजनिक आरोग्य विभाग / माहिती व तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग).

विषय :- मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९.८.२०१९ रोजी दुपारी २.०० वा. वर्षा बंगला येथे झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठक क्रमांक १ चे इतिवृत्त.

महोदय,

मा. मुंख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९.८.२०१९ रोजी दुपारी २.०० वा. वर्षा बंगला येथे जुलै २०१९ ते ऑगस्ट २०१९ या कालावधीमध्ये अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या पूर परिस्थितीत बाधीत आपदग्रस्तांना मदत करण्याच्या अनुषंगाने चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी आयोजित केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठक क्रमांक १ चे इतिवृत्त आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

तात्काळ कार्यवाही करावी.
- संचालक (उशि.)
- संचालक (तंशि.)
- संचालक (कला)

DS(T) Urgently Circulate to all Univ./Colleges/Instt. 21/8

आपला,

(सु. ह. उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत आवश्यक त्या माहितीसाठी अग्रेषित :-

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मुख्य सचिवांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव, मदत व पुनर्वसन यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय,मुंबई.

महसुल व वन विभाग/म-३

विषय: मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९.८.२०१९ रोजी दुपारी २.०० वा. वर्षा बंगला येथे झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठक क्रमांक १ चे इतिवृत्त

मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक दिनांक १९.८.२०१९ रोजी दुपारी २.०० वा. वर्षा बंगला येथे पुरग्रस्तांच्या मदतीबाबत चर्चा करून निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

| अ.क्र | विषय | निर्णय | कार्यवाही करणारा संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १) | पूर परिस्थितीमध्ये मृत झालेल्या पशुधन व पक्षी यांच्यापैकी जे पशुधन वाहून गेले आहे व त्यांचा तपास लागत नाही त्याबाबत निर्णय घेणे. | याबाबत **तलाठी, पोलिस पाटील, सरपंच , ग्राम पातळीवरील सहकारी दुध संघाचे संचालक व संबंधित पशुधनाचे मालक** यांनी स्वाक्षरीत केलेला स्पॉट पंचनामा मदतीसाठी **ग्राह्य धरण्यात** यावा. | आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग |
| २) | जुलै- ऑगस्ट २०१९ मधील अतिवृष्टी व पूर छोटे उदयोगधंदे / हस्तकला / हातमाग कारागिर/ बारा बलुतेदार/ छोटे दुकानदार/ टपरीधारक/ हातगाडीधारक/ छोटे गॅरेज यांना मदत मिळणेबाबत. | पूरग्रस्त भागातील हस्तकला / हातमाग कारागिर/ बारा बलुतेदार/ छोटे दुकानदार/ टपरीधारक/ हातगाडीधारक/ छोटे गॅरेज जे स्थानिक रहिवाशी / मतदार यादीत नाव/ रेशनकार्ड धारक आहेत त्यांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्षात झालेल्या **नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम अथवा जास्तीत जास्त रू.५०,०००/- पर्यंत आर्थिक** मदत देण्यात यावी. ग्रामीण भागात पंचनामा महसूल यंत्रणेने करावा व शहरी भागात महानगरपालिका/ नगरपालिका यांच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने महसुल विभागाने पंचनामा करावा . | आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग |
| ३) | विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक नैआ/काथि-८०५/२०१९, दि.१२.८.२०१९ अन्वये सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हयातील ऑगस्ट,२०१९ मध्ये पुराने बाधित कुटुंबियांना दयावयाच्या मदतीबाबत | विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे हे बैठकीस उपस्थित होते. त्यांच्या प्रस्तावावर चर्चा होवून पुरामुळे अभूतपुर्व परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे एक विशेष बाब म्हणून तसेच ही बाब पुर्वोदाहरण म्हणून न समजण्याच्या अटीवर विभागीय आयुक्तांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसे विभागीय आयुक्तांना पत्राने कळविण्यात यावे. | सचिव,आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | पक्की/कच्ची घरे, अंशत: पडलेली पक्की/कच्ची घरे व पुर्णत: पडलेली पक्की/कच्ची घरे त्याबाबत निर्णय घेणे | १. जी घरे पुराच्या पाण्यामुळे पुर्णत: पडली आहेत त्या कुटुंबाना ग्रामीण भागाकरिता प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) खाली लाभ देण्यात येईल. या योजनेतंर्गत अनुज्ञेय रक्कमे व्यतिरिक्त दि १३.५.२०१५ च्या शासन निर्णयानुसार SDRF/NDRF अंतर्गत अनुज्ञेय असलेली रक्कम अशी दोन्ही मिळून ग्रामीण भागात घर बांधण्यासाठी मदत देण्यात येईल.<br>२. शहरी भागामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) खाली लाभ देण्यात येईल. या योजनेतंर्गत अनुज्ञेय रक्कमे व्यतिरिक्त दि १३.५.२०१५ च्या शासन निर्णयानुसार SDRF/NDRF अंतर्गत अनुज्ञेय असलेली रक्कम अशी दोन्ही मिळून शहरी भागात घर बांधण्यासाठी मदत देण्यात येईल.<br>३. बाधित कुटुंबाला तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करून घेण्यासाठी/ घर भाडयाने घेवून राहण्यासाठी शहरी भागात रू ३६,०००/- व ग्रामीण भागात रू २४,०००/- इतकी रक्कम एकरकमी मदत म्हणून देण्यात यावी. यातून त्यांनी राहण्याची किंवा तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था स्वत: करावी. | अ.मु.स.(गृहनिर्माण)/ सचिव,आपत्ती व्यवस्थापन , मदत व पुनर्वसन / अ.मु.स.(सार्वजनिक बांधकाम) / प्रधान सचिव (जलसंपदा) /प्रधान सचिव (ग्रामविकास ) |
| ५) | पूरग्रस्त परिस्थितीमध्ये शेतक-यांची पीके पूरामुळे पूर्णपणे वाया गेली आहेत त्यामुळे पूरग्रस्त शेतक-यांच्या शेतीसाठी घेतलेल्या कर्जाबाबत विचार करणे | १. ज्या शेतक-यांची पीके पूरामुळे नष्ट झाली आहेत अशा शेतकऱ्यांपैकी ज्यांनी सन २०१९-२० साठी पीक कर्ज घेतले होते त्यांना १ हेक्टर मर्यादेपर्यंत अधिकतम अनुज्ञेय असलेल्या पीक कर्जाच्या रकमेइतकी कर्ज माफी देण्यात यावी.<br>२. ज्या शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतले नाही व त्याची पिके पुरामुळे नष्ट झाली आहेत अशा शेतकऱ्यांना दि १३.५.२०१५ च्या शासन निर्णयानुसार SDRF/NDRF नुसार त्या पिकासाठी अनुज्ञेय असलेल्या मदतीच्या दराच्या तिप्पट रक्कम मदत म्हणून देण्यात यावी. | १. प्रधान सचिव( सहकार)<br>२.आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग |
| ६) | पुरग्रस्त भागातील शेतक-यांच्या कृषीपंपाची वीज बिले माफ करणे. | पुरग्रस्त भागातील शेतक-याच्या कृषीपंपाची वीज बिले भरण्यासाठी ३ महिने स्थगिती देण्यात आली. | प्रधान सचिव (ऊर्जा)/ व्यवस्थापकीय संचालक, महावितरण |

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | पूरग्रस्तांना तात्काळ नवीन कागदपत्रे उपलब्ध करून देण्याकरीता स्वतंत्र यंत्रणा उभी करणे. | पूरग्रस्तांचे आधारकार्ड, रेशनकार्ड, बँक पासबुक, मार्कलिस्ट, शैक्षणिक दाखले, इ कागदपत्रे वाहून जाणे, भिजणे, नष्ट होणे याकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, आपले सरकार सेवा केंद्र, महाऑनलाईन व इतर अनुषंगिक शासकीय केंद्रे यांचेमार्फत त्वरीत उपलबध करून मोफत वाटप करण्यात यावे व त्याची बिले सेतू केंद्राकडे असलेल्या रकमेतून अदा करावीत. | अपर मुख्य सचिव, (महसूल)/अमुस(शालेय शिक्षण)/ सचिव( उच्च व तंत्र शिक्षण)/प्रधान सचिव (ग्रामविकास)/ प्रधान सचिव(माहिती व तंत्रज्ञान) /सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन |
| ८) | ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा व प्रधानमंत्री आवास योजना रमाई, शबरी, आदिम इत्यादी घरकुलांबाबत | मुद्दा क्रमांक ४ मध्ये घेतलेल्या निर्णयाप्रमाणे लाभ देण्यात यावा व लाभार्थी ज्या योजनेतंर्गत पात्र ठरतील त्या त्या योजनेमध्ये त्यांना लाभ देण्यात यावा. | अ.मु.स.(गृहनिर्माण)/प्रधान सचिव( ग्राम विकास) / प्रधान सचिव(नवि-२) |
| ९) | पुरग्रस्त भागातील घरांच्या दुरूस्तीसाठी व बांधकामासाठी वाळू व मुरूम उपलब्ध करून देणे | पूरग्रस्त भागातील घरांची दुरूस्ती व नवीन घरांच्या बांधकामासाठी आवश्यकतेप्रमाणे ५ ब्रास वाळू व ५ ब्रास मुरूम बाधित कुटुंबियांना मोफत उपलब्ध करून देणेसाठी शासन आदेश निर्गमित करावेत. | अपर मुख्य सचिव, (महसूल) |
| १०) | पूरामध्ये शेतक-यांबरोबरच व्यापारांचे सुध्दा नुकसान झाले त्यांना GST व आयकर रिटर्न भरणेस मुदतवाढ देणेबाबत | पूरामध्ये शेतक-यांबरोबर व्यापारांचे सुध्दा नुकसान झाले आहे. त्यांची कागदपत्रे पूरात वाहून गेलेली असल्यामुळे त्यांना जीएसटी रिटर्न भरणेसाठी व आयकर रिटर्न भरण्यास मुदतवाढ देणेबाबत केंद्र शासनास पत्र पाठविण्यात आलेले आहे. | अपर मुख्य सचिव (वित्त) |
| ११) | व्यापारी व कारखानदारांना पुन्हा व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज देणेबाबत | व्यापा-यांना व्यवहारासाठी वापरण्यात येणा-या बँक कॅश क्रेडीट व माल तारणावरील कर्ज बिनव्याजी देणेबाबत व नव्याने उदयोग व्यापार सुरू करण्यासाठी नवीन कर्ज देण्याबरोबरच जुन्या कर्जांना हप्ते वाढवून देण्याकरीता बँकांना आदेश देण्यासाठी केंद्र शासनास पत्र पाठविण्यात आले आहे. | अपर मुख्य सचिव (वित्त) |
| १२) | पूरग्रस्तभागातील मुलांची परिक्षा फी माफ करणेबाबत | पूरग्रस्त भागातील मुलांची परिक्षा फी माफ करणेबाबत संबंधित सचिवांनी अभ्यास करून त्याबाबत निर्णय घेण्यात यावा.<br>बालभारती मार्फत पुस्तके व वहया देणेबाबत विभागाने निर्णय घ्यावा. | अपर मुख्य सचिव, (शालेय शिक्षण व क्रिडा विभाग)/ सचिव (उच्च व तंत्रशिक्षण विभाग) |

| | | | |
|---|---|---|---|
| १३) | जनावरांच्या गोठयांकरीता अर्थसहाय्य देण्याबाबत. | घरांसोबतच जनावरांच्या गोठयांचे नुकसान झाले आहे. बाधित झालेला गोठा घराला जोडून असला किंवा शेतात असला तरीही दि १३.५.२०१५ च्या शासन निर्णयानुसार SDRF/NDRF च्या दरानुसार रू. २१००/- प्रति गोठा व राज्य शासनाकडून वाढीव रू ९००/- या प्रमाणे एकूण रू ३०००/- प्रति गोठा मदत देण्यात यावी. | सचिव, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन |
| १४) | पूरग्रस्त क्षेत्रातील कामे तातडीने हाती घेण्यासाठी अल्प मुदतीची निविदा निर्गमित करण्याबाबत. | पूरग्रस्त क्षेत्रातील कामे तातडीने हाती घेण्यासाठी अल्प मुदतीची निविदा निर्गमित करणे आवश्यक असल्याने संबंधित प्रशासकीय विभागांनी त्या संदर्भातील आदेश निर्गमित करावेत. | अ.मु.स./प्र.स. (सार्वजनिक बांधकाम/ जलसंधारण/ उदयोग व उर्जा/जलसंपदा/पाणी पुरवठा व स्वच्छता/ग्राम विकास/नगर विकास व इतर |
| १५) | राज्यातील पूर परिस्थितीचा अभ्यास करून आवश्यक उपाययोजनात्मक अहवाल शासनास सादर करण्यासाठी तज्ञ समिती गठीत करण्यास मान्यता देणेबाबत. | राज्यातील सध्या उदभवलेल्या पूर परिस्थितीचा अभ्यास करून पुरपरिस्थिती निर्माण होण्याची कारणे, भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी करावयाची उपाययोजना व तांत्रिक विश्लेषण करून अहवाल शासनास सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे तज्ञ समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात आली : समितीने त्यांच्या पहिल्या बैठकीत अहवाल सादर करण्याचा कालावधी ठरवून घ्यावा व जास्तीत जास्त ३ महिन्यात शासनास अहवाल सादर करण्याची दक्षता घ्यावी.<br>१. श्री. नंदकुमार वडनेरे -- अध्यक्ष<br>२. श्री विनय कुलकर्णी, तांत्रिक सदस्य, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण ---सदस्य<br>३. श्री संजय घाणेकर.सचिव (प्रकल्प समन्वय)- सदस्य<br>४. प्रा.रवी सिन्हा, आयआयटी, मुंबई---सदस्य<br>५. श्री नित्यानंद रॉय, मुख्य अभियंता, केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली-- सदस्य<br>६. संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजिता केंद्र, नागपूर -- सदस्य<br>७. उप महासंचालक, भारतीय हवामान विभाग, मुंबई -- सदस्य<br>८. संचालक, आय.आय.टी.एम, पुणे - सदस्य<br>९. श्री. प्रदीप पुरंदरे -- सदस्य,<br>१०. सचिव( लाक्षेवि) -- सदस्य- सचिव | सचिव (लाक्षेवि) जलसंपदा विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यासंदर्भातील शासन निर्णय व त्याबाबत करण्यात यावयाच्या कार्यवाहीबाबत सचिव (लाक्षेवि) -- सदस्य सचिव यांनी कार्यवाही करावी. | |
| १६) | पूरग्रस्त कुटुंबांना करावयाच्या आर्थिक मदतीबाबत कुटुंबाची व्याख्या ठरवणे व मदतीबाबत | सध्या पूरग्रस्त कुटुंबांना मदतीचे वाटप सुरू आहे. याचा लाभ देण्यासाठी केवळ शिधा पत्रिकेचा आधार न धरता दोन वेगवेगळी घरे इतर अनुषंगिक पुरावे जसे वेगवेगळी विद्युत देयके, दोन स्वतंत्र गॅस कनेक्शन किंवा इतर असा पुरावा जो कुटुंब स्वतंत्र असल्याचे सिध्द करत असेल अशी कागदपत्रे विचारात घेवून कुटुंबे मदतीसाठी अनुज्ञेय ठरवावीत. | सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन |
| १७) | अतिवृष्टी व पूरामुळे बाधित झालेल्या कुटुंबांना अन्न धान्य वितरीत करण्याबाबत | अतिवृष्टी व पूरामुळे आपत्कालीन परिस्थिती उदभवून दोन दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी क्षेत्र पाण्यात बुडाले असल्यास त्यामुळे निराधार होणा-या कुटुंबांना प्रति कुटुंब १० किलो गहू, १० किलो तांदूळ मोफत पुरविण्यात येत आहे. असा लाभ देताना लाभार्थ्यांनी मदत छावणीमध्ये आश्रय घेतला नसल्याचे जिल्हाधिकारी यांनी प्रमाणित करण्याची आवश्यकता राहणार नाही.<br>हा लाभ ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर या ३ महिन्यासाठी देण्यात यावा. | अपर मुख्य सचिव (वित्त) प्रधान सचिव(अन्न व नागरी पुरवठा) |
| १८) | पूरग्रस्त भागातील शेतक-यांना पिक विम्याची रक्कम त्वरीत मिळणेबाबत | पूरग्रस्त भागातील शेतक-यांना पिक विम्याची रक्कम त्वरीत मिळणेसाठी कृषी विभागाने हेल्प लाईन त्वरीत सुरू करावी. तसेच पूरग्रस्त भागातील पिकांचे नुकसानीचे पंचनामे त्वरीत करण्याबाबत कार्यवाही सुरू असल्याचे सांगण्यात आले. | सचिव( कृषी) |
| १९) | पूरग्रस्त भागातील पाणी पुरवठा योजना त्वरीत सुरू करणेबाबत | कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांचा आढावा घेवून त्या त्वरीत सुरू करणेबाबत कार्यवाही करावी व पाणी पुरवठा सुरळीत होईपर्यंत आवश्यकता असल्यास **टँकरने पाणी पुरवठा** करण्यात यावा. टँकर कमी पडत असल्यास पाणी पुरवठा विभागाने दुसऱ्या जिल्हयातून टँकर भाडयाने घेण्याबाबत कार्यवाही करावी. | अपर मुख्य सचिव ( पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) |

| | | | |
|---|---|---|---|
| २०) | पूरग्रस्त भागातील रस्ते व पुलांची कामे व दुरूस्ती सत्वर करून रस्ते वाहतुकीसाठी सुयोग्य करणे | पूरग्रस्त भागातील रस्ते व पुलांची कामे व दुरूस्ती, **विशेषत: मुंबई-गोवा महामार्ग लवकरात लवकर** सुरळीत करणेबाबत विभागाने कार्यवाही करावी. | अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) |
| २१) | पूरपरिस्थती ओसरल्यानंतर रोगराई पसरू नये म्हणून काळजी घेणेबाबत. | सर्व ठिकाणी वैद्यकीय पथके कार्यरत आहे. गोळया व औषधांचा तुटवडा पडणार नाही याची दक्षता घेवून क्षेत्रीय कार्यालयांना आवश्यक त्या सुचना संबंधित विभागांनी दयाव्यात. कर्नाटक व केरळ राज्याने केंद्र शासनाकडे मागणी नोंदवून औषधे प्राप्त करून घेतली आहेत. त्याचप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागाने केंद्र शासनाकडे मागणी करावी. | प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग) |
| २२) | राज्यातील काही सामाजिक संस्था गावे दत्तक घेवून त्यांचे पुनर्वसन करण्यास तयार आहेत | राज्यातील सामाजिक संस्थांची क्षमता विचारात घेवून त्यांना कोणते गाव दत्तक देता येईल याबाबत ज़िल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी निर्णय घ्यावा. तसेच शासकीय जागा घर बांधणीसाठी उपलब्ध करण्याबाबत व पायाभूत सुविधा जसे कि, विद्युत पुरवठा, पाणी पुरवठा, रस्ते याबाबत पायाभूत सुविधा जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करून दयावी. तसेच जर शासकीय जागा उपलब्ध नसेल तर भुसंपादनाव्दारे जागा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावी. | विभागीय आयुक्त,पुणे जिल्हाधिकारी, सांगली/कोल्हापूर/सातारा |
| २३) | शासन निर्णय त्वरित निर्गमित करण्याबाबत | बैठकीत झालेले चर्चेप्रमाणे सर्व शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी ते विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे व मुख्य सचिव यांचेकडून तपासून घेतल्यानंतरच निर्गमित करण्याची दक्षता घ्यावी. | सर्व संबंधित विभागाचे अ.मु.स./प्र.स./सचिव. |

मा. अध्यक्षाचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

********